



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १२ जानेवारी २०२५ | अंक ३४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


## आमच्याविरोधात लढलेल्यांना महायुतीत नो एन्ट्री



महाराष्ट्रात मिळालेल्या महाविजयानंतर शिर्डीत रविवारपासून भाजपाचे दोन दिवसीय अधिवेशन भरणार आहे. महाराष्ट्राच्या जनतेचे महायुतीला बहुमत दिले. २३७ आमदाराचे सरकार महाराष्ट्राने निवडून दिले. त्याबद्दल जनतेचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानण्यासाठी हे अधिवेशन भरविण्यात आले आहे. पुण्याच्या बालेवाडी अधिवेशनात विधानसभेची तयारी केली होती. उद्याच्या शिर्डीतील अधिवेशनात जनतेचे आभार मानण्याबरोबर महाराष्ट्र भाजपाची सदस्य संख्या १.५ कोटी करण्याचा संकल्प मांडला जाणार असल्याचे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.शिर्डीतील भाजपाच्या या अधिवेशनाची सुरुवात उद्या रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार आहेत. तर समारोप अमित शाह करतील. नितीन गडकरी पहिल्या सत्राचे समापन करतील. पुण्यातील बालेवाडीच्या अधिवेशनात महाविजयाचा संकल्प केला होता. आता विजयानंतर जनतेचे आभार मानत आहोत, तसेच महाराष्ट्र भाजपाची दीड कोटी सदस्य संख्या असावी असा संकल्प आपण केला आहे. १ लाख बुथ अध्यक्ष समिती असावी, प्रत्येक तालुक्यात आमचा अध्यक्ष असावा आणि ही समिती फेब्रुवारी महिन्यापर्यंत गठीत व्हावी असा प्रयत्न आहे. ६९ जिल्हाध्यक्ष आणि मुंबई धरुन ७६ जिल्हाध्यक्ष हे फेब्रुवारीपर्यंत निवडले जातील. बुथ, तालुका आणि जिल्हाध्यक्ष निवडल्यानंतर प्रदेश अध्यक्ष निवडले जातील असेही चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे डबल इंजिन सरकार जे निर्णय घेते, ते संघटनेच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचावे हा या अधिवेशनाचा भाग आहे. निवडणूक पूर्वी वचननामा दिला होता. त्याच्या पूर्तीसाठी देवेंद्र फडणवीस निर्णय घेतील. तसेच या निर्णयांचा समाजाला फायदा व्हावा म्हणून संघटना काम करेल. भाजपच्या या अधिवेशनात १५ हजार प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. हे अधिवेशन सर्वात जास्त प्रतिनिधींचे अधिवेशन ठरणार आहे. राधाकृष्ण विखे पाटील आणि इथली टीम आम्हाला मदत करीत आहे.

## इंडियन पोलीस मित्र मंडळाच्या जिल्हा अध्यक्ष पदी गजानन जाधव यांची नियुक्ती



डि.एस. राठोड फाऊंडेशन व मार्शल योगा अकॅडमी संचालीत, इंडियन पोलीस मित्र या सामाजिक संस्थेच्या जिल्हा अध्यक्ष पदी अंचरवाडी ता. चिखली जि बुलढाणा यांची निवड मुख्य अधिकारी महाराष्ट्र पोलीस मित्र,डॉ. सुरेश राठोड आणि महासंचालक डॉ. कृष्णा देवगीरी यांनी एका नियुक्ती पत्राव्दारे केली आहे .गजानन जाधव हे सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असून पोलीस आणि समाज समस्या, यांच्यात समरसता व्हावी गुहेगारी कमी व्हावी तसेच समुपदेशन या हेतूने इंडियन पोलीस मीत्र काम करीत असून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात शाखा आहेत . गजानन जाधव हे सामाजिक कार्यकर्ते असून याचबरोबर चित्रपट कलावंत देखील आहेत, त्यानी अनेक चित्रपट लघुपट, सिरीयल मध्ये दमदार भूमिका केल्या आहेत .तसेच नाट्य कला, सांस्कृतिक कार्यक्रम करीत आहेत . त्यांच्या या निवडीमुळे त्यांच्यावर मित्रमंडळी गावकरी यांच्या कडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

# देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींवर मोक्का

## वाल्मिक कराड वर केवळ खंडणीचा गुन्हा




बीड : संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सर्व सात आरोपींना मोक्का लावण्यात आला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनामध्ये ही कारवाई होणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर आता या सर्व आरोपींवर मोक्का कायद्याअंतर्गत अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, राज्याला हादरवून टाकणाऱ्या संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या मुसक्या आवळण्यात सुरुवात केली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आत्तापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली असून या सर्वांवर आता मोक्का लावण्यात आला आहे. मुख्य आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे, जयराम चाटे, विष्णू चाटे, प्रतिख घुले, महेश केदार, सिद्धार्थ सोनवणे या सर्वांवर मोक्का लावण्यात आला आहे. यामध्ये वाल्मिक कराड वर अद्याप मोक्का लागू करण्यात आलेला नाही. वाल्मिक कराडवर फक्त खंडणीचा गुन्हा दाखल असून, त्याला संतोष देशमुख हत्या प्रकरणात अटक झालेली नाही. त्यामुळे त्याच्यावर मोक्काची कारवाई झालेली नाही. यामुळे या प्रकरणात तपास प्रक्रियेसाठी आणखी वेळ लागू शकतो. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सुदर्शन घुलेसह इतर सात जणांवर खंडणी हाफ मर्डरसह इतर गंभीर गुन्हे दाखल आहेत. सुदर्शन घुले विरोधात यापूर्वी अपहरण केल्याची नोंद आहे. यावरून हे सर्व गुन्हेगार सराईत असल्याचे दिसून येते. हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले होते.

## सुरेश धस यांनी बीडला बदनाम केलं मंत्री पंकजा मुंडे

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यातील राजकारण, समाजकारण ढवळून निघाले आहे. सुरुवातीला मारेकऱ्यांना मोकळे रान करून देर्णाया यंत्रणांना जनरेट्यापुढे अखेर कारवाई करावी लागली. या निर्घृण हत्येच्या एका महिन्यानंतर सात आरोपींना मोकका लावण्यात आला आहे. या हत्येनंतर मुंडे विरुद्ध इतर नेते असे बीडमध्ये चित्र रंगले आहे. राष्ट्रवादी, शिवसेना, भाजपा अशा पक्षांच्या नेत्यांनी धनंजय आणि पंकजा मुंडे यांच्याविरोधात मोर्चा उघडला आहे. तर पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांच्यावर जिल्ह्याची बदनामी केल्याचा पलटवार केला आहे. काय म्हणाल्या पंकजा मुंडे?मंत्री पंकजा मुंडे यांनी यासर्व प्रकारावर प्रतिक्रिया दिली आहे. माझी प्रतिक्रीया काय असणार? असे म्हणत, गृह विभागाने निर्णय घेतलाय तर त्यांनी आश्वासन दिलं आहेकी कारवाई करणार आहेत, एका तरुणाची निर्घृण हत्या झाली. ज्यांना राजकारण करायचं ते करत आहेत, असे त्या म्हणाल्या. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते जर म्हणत असतील की शोध लागत नाही तोपर्यंत कारवाई करणार नाही. त्यावर मी काऊंटर करणार नाही. शोध लागेपर्यंत कारवाई करणार नसतील तर त्यावर मी रोज काय बोलू? असे त्या म्हणाल्या.सुरेश धसांना घेतले फैलावरमी महिला म्हणून खासदार राहिले, केशरकाकू, प्रितम मुंडे सगळ्या महिलांनी काम केलं. ज्या जिल्ह्यातून सगळ्यात जास्त ऊस तोड कामगार जातात, त्याला बदनाम करण्यात आलं. गुन्हेगारी लोक असती तर दरोडे घातले असते. माझ्याकडे प्रत्येक जिल्ह्याचा रेकॉर्ड आहे, मुळशी पॅटर्नच्या घटना आहेत. नागपूर मध्ये महिलेला पायावर नाक घासून माफी मागायला लावलं असे त्या म्हणाल्या.धस यांच्यावर काय बोलू? मी कुठं गप्प आहे. मी एसआयटीची मागणी केली होती. पहिली मागणी मी केली. माझ्या बोलण्यामुळे राज्य हलले असते तर आत जे ते बोलताय ते पूर्वी का बोलले नाही. मागच्या २ वर्षात का बोलले नाही, असा सवाल पंकजा मुंडे यांनी सुरेश धसांना केला.



## विनयभंग केल्याच्या आरोपातून आरोपींची निर्दोष मुक्तता ॲड. सचिन काळे

विनयभंग केल्याच्या गंभीर आरोपातून दोन अरोपींची निर्दोष मुक्तता केली- याबाबात थोडक्यात माहिती असे की,दि.१९/९/२०२१ रोजी रात्री १२: ३० वा पीडित ही घरात मुला सोबत झोपली होती व बाजूच्या रूममध्ये माझी सासू या झोपलेल्या होत्या व माझे सासरे शेतामध्ये बाजरीचे पीक असल्याने पीकास राखण करण्यासाठी शेतात झोपायला गेले होते त्यावेळी आमचे गावातील कृष्णा वनवे हा आला व माझ्या दरवाज्याची कडी वाजून लागला तेव्हा मी त्याच घरातून आवाज दिला कोण आहे त्यावेळी तो मला म्हणाला की दार उघड मी कृष्णा आहे मला पाणी प्यायचे आहे त्यावेळी मी हि त्यास म्हणाले की दारात पाण्याचा हंडा ठेवलेला आहे नंतर मी जाऊन झोपले परत एक ते दीड वाजण्याचे सुमारास कृष्णा हा परत दरवाज्याची कडी वाजू लागला व मला दार उघड दार उघड असे म्हणू लागला नंतर मी दरवाज्य जवळ येताच दारातील लाईट चालू करण्यासाठी बटन टाकले असता बाहेरील बल्प लागला नाही अंधार दिसला तेव्हा मी मोबाईलची बॅटरी लावून दार उघडले असता कृष्णाने माझ्या हाताला धरले व मनाला की राणी तू मला खूप आवडतेस असे म्हणून माझे तोंड दाबले व माझी छाती दाबली नंतर त्यावर मी ओरडले तेव्हा त्याचा चुलत भाऊ आजिनाथ हा पण ते आला व मला म्हणाला की मला पण तू बरेच दिवसापासून आवडतेस मी तुझ्यामुळे तर जालन्याहून तुला भेटण्याकरिता गावाकडे आलो आहे असे म्हणून त्याने माझ्या गचो-याला धरून ओढले तेव्हा मी आरडाओरडा केली माझा आवाज ऐकून माझी सासू बाजूच्या रूम मधून बाहेर आली तेव्हा मला कृष्णा व आजिनाथ या दोघांनी झोंबा झोंबी करून वाईट हेतूने माझा विनयभंग केला व छेडछाड केली तेव्हा माझी सासू ने कृष्णाला धरले असता कृष्णाने माझ्या सासूला ढकलून दिले व आम्हाला शिवीगाळ करून पळून गेले त्यानंतर पीडित दिनांक २०/९/२०२१ रोजी नेकनूर पोलीस स्टेशन येथे जाऊन फिर्याद दिली फिर्यादी नुसार कलम ३५४, ३५४(अ), ३५४(ब),३२३, ५०४,३४ भा.द.वी नुसार गुन्हा नोंद करण्यात आला त्यास गु.र.नं २०७/२१ असा पडला होता त्यानंतर तपासी अधिका-याने त्या फिर्यादी नुसार योग्य तो तपास करून दोषारोपपत्र मा न्यायालयात दाखल केले होतो दोषारोपपत्रास ठउउ क्र.२१३/२२ असा पडला. फिर्यादी पक्ष्यामार्फत ५ साक्षीदार तपासण्यात आले साक्षीदारांची साक्ष आरोपी विरुद्ध आरोप सिद्ध करू शकले नाही व आरोपीचे वकील अँड. सचिन काळे यांनी घेतलेला बचाव व सबळ पुराव्या आधारे सर्व आरोपींना मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ७ वे यांनी सदर प्रकरणातून दोन्हीं आरोपींची दि.१०/१/२०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. सचिन काळे यांनी काम पाहिले व त्यांना सदर प्रकरणात ॲड. पवन नागरगोजे यांनी सहकार्य केले..




# बीड शहरातील रखडलेल्या रस्ते ; धुर ,धुळीने बीडकरांचा श्वास गुदमरला

## स्थानिक लोकप्रतिनिधींनीच्या उदासीनतेमुळे थेट केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरींनाच साकडे :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- (दि.११ )बीड शहरातुन जाणारे दोन राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडलेल्या अवस्थेत असुन संथगतीने होणा-या कामांमुळे धुर आणि धुळीमुळे बीडकरांचा श्वास गुदमरला असुन स्थानिक लोकप्रतिनिधींनीकडुन होणारे दुर्लक्ष यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांनी थेट केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी यांनाच साकडे घातले असुन सोमवारी दि.१३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ नितिन गडकरी यांच्या प्रतिमेची महाआरती करून बीड शहरातील रखडलेल्या अवस्थेत असणारे अर्धवट काम केलेले बीड ते अहिल्यानगर आणि धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावेत . बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ रस्त्याचे काम बीड शहर ते नवगणराजुरी दरम्यान ठेकेदार व बांधकाम विभागाच्या नियोजनाअभावी वर्षभरापासून रखडलेले असुन त्यामुळे नागरिकांना ,वाहनचालकांना धुळ, खड्डे,कचखडी यांचा त्रास सहन करावा लागत आहे.तसेच बीड शहरातील १८ कोटी रुपये किंमतीचे राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल सिमेंट रस्ता काम अडीच वर्षांपूर्वी होऊनही साइडपंखे भरलेले नाहीत.दुभाजकांचे काम पूर्ण केले नाही त्यामुळे शहरातील रस्त्यांवरुन जाताना येताना वाहने घसरुन अपघात होत आहेत. तसेच बीड जिल्ह्यातील खामगाव ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील माजलगाव ते केज




दरम्यान तसेच अहमदपूर ते अहिल्यानगर मार्गावरील अंबेजोगाई ते मांजरसुंभा दरम्यान आणि पैठण ते पंढरपूर महामार्गावरील पाटोदा आणि शिरूर कासार याठिकाणी रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे व अर्धवट रखडलेल्या अवस्थेत असुन तातडीने पूर्ण करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस, सुदाम तांदळे,रामनाथ खोड, शिवशर्मा शेलार,यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत लेखी निवेदनाद्वारे केली आहे.दिडवर्षापासून रखडलेल्या बीड ते अहिल्यानगर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ मार्गावरील शिरापुर फाटा ते बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि बार्शी नाका ते जरूड फाटा असा १६० कोटी रूपयांचे अंदाजपत्रक असलेल्या २४.५ किलोमीटरचा ९४ फुट रूंद असलेल्या रस्त्याचे काम ३० जुन २०२३ रोजी सुरू करण्यात आले. बीड शहरातील नगर रोडवर महत्वाची सर्वच शासकीय कार्यालये आहेत.यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा न्यायालय, सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृह, तहसिल पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग,यासह महाविद्यालय,हास्पिटल असुन शहराच्या दृष्टीने महत्वाचा रोड आहे.गेल्या दिड वर्षात केवळ दिड किलोमीटरचे काम करण्यात आलेले आहे. रस्त्याचे काम अत्यंतसंथ गतीने सुरू असुन रेंगाळलेल्या कामामुळे रस्त्याने जाणा-यांना प्रचंड धुळीचा सामना करावा लागत असुन नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तातडीने काम पूर्ण करण्यात यावे. राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल सिमेंट रस्त्याचे काम अर्धवट, दुभाजके अपुर्ण,साईडपंखे भरलेले नाहीत बीड शहरातील १८ कोटी रुपये किंमतीच्या राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल सिमेंट रस्ताकाम अडीच वर्षांपूर्वी पुर्ण झाले आहे.मात्र रस्त्यावरील साईडपंखे भरलेले नाहीत. तसेच दुभाजकांचे कामही पूर्ण केलेले नाही.त्यामुळे शहरातील रस्त्यांवरुन सिमेंट रस्त्यावर जाताना व येताना वाहने घसरुन अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अडीच वर्षांपूर्वी भारतीय राज्य महामार्ग प्राधिकरण एनएचएआय वतीने शहरातील राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल दरम्यानचा १.२५ किलोमीटर रस्त्याचे काम करण्यात आले. त्यानंतर तो रस्ता देखभालीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे.मात्र बांधकाम विभागाने डागडुजी केली नाही.साईडपंखे रस्ता तयार करणारांनी भरून काढणे गरजेचे असल्याचे बांधकाम विभागाचे अधिकारी सांगतात त्यामुळे काम रखडलेलेच आहे.ते पूर्ण करण्यात यावेत.बीडकरांचे आरोग्य धोक्यात ,धुर व धुळीमुळे श्वास गुदमरला बीड शहरातील रखडलेले रस्ते कामामुळे जागोजागी धुळीचे साम्राज्य पसरले असुन धुळीमुळे श्वसनाचे आजार जडतात. यामुळे दम लागणे, खोकला येणे, श्वासोच्छवासास त्रास होणे तसेच श्वसन मार्गाला संसर्ग होऊन ईतर आजारही उद्भवतात त्यामुळे बीडकरांचे आरोग्य धोक्यात आले आले.

बीड जिल्ह्यातील खामगाव ते पंढरपूर, अहमदपूर ते अहिल्यानगर आणि पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय व राज्यमार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे , बीड जिल्ह्यातील खामगाव ते पंढरपूर महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव तसेच अहमदपूर ते अहिल्यानगर मार्गावरील लोखंडी सावरगाव ते मांजरसुंभा आणि पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा शहर आणि शिरूर कासार घाट आदी ठिकाणी निकृष्ट दर्जाचे व रखडलेल्या अवस्थेत कामे असुन तातडीने पूर्ण करण्यात यावेत.

बीड जिल्ह्यात अपघातात बळी जाणारांची संख्या वाढली बीड जिल्ह्यात सन २०२२ साली ७३४ अपघात झाले.यामध्ये ३९४ भीषण अपघात होते.यामध्ये जवळपास ४६२ जणांचा मृत्यू झाला.तर २७० गंभीर अपघातात ४६१ जणांना कायमचे अपंगत्व आले.तर किरकोळ अपघातात ५८ जण जखमी झाले होते तसेच सन २०२३ साली जवळपास ८०३ अपघात झाले.यामध्ये ४५० जणांचा मृत्यू झाला.यामध्ये ४०१ पुरूष तर ४९ महिलांचा समावेश होता.तर ५३३ जणांना कायमचे अपंगत्व आले आहे तर ४४ जणांना गंभीर स्वरूपाचा मार लागला होता.सन २०२४ साली १ जानेवारी ते ३१ आगस्ट २०२४ या ८ महिन्यात २७३ अपघात झाले. या ८ महिन्यात राष्ट्रीय महामार्गावर ५२ तर राज्य मार्गावर १२९ व ईतर रस्त्यावर ९२ अशा एकुण २७३ अपघातात २६३ पुरूष व ३१ महिलांचा मृत्यू झाला आहे.याच कालावधीत जिल्ह्यात २३० अपघात असे घडले की त्यात २९२ जण गंभीर रित्या जखमी यात ३२२ पुरूष व ७० महिलांचा समावेश आहे.

## संपादकीय

## २०२५ नव्या कॅलेंडर वर्षातील महत्त्वाच्या तारखा


१ जानेवारी २०२५ ला नवे कॅलेंडर वर्ष सुरू झाले. या वर्षातील काही लक्ष ठेवण्यासारख्या तारखा किंवा कालावधी खालीलप्रमाणे यात एखादी अंतिम तारीख दिली असली तरी त्यासंबंधित गोष्टीची पूर्तता मुदतीपूर्वीच करावी म्हणजे गोंधळ उडणार नाही, दंड पडणार नाही. ३१ जानेवारी २०२५/ १५ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ आर्थिक वर्ष २०२४-२०२५ येत्या काही दिवसांत संपेल. हीच वेळ आहे आपल्या अंदाजित उत्पन्नाचा आढावा घेऊन पुरेशी गुंतवणूक करण्याची. आपण कर मोजण्याची जुनी पद्धत स्वीकारली असेल तर काही गुंतवणूक/खर्च याची वजावट घेतल्याने आपला आयकर कमी होऊ शकतो. पगार पत्रकाव्यतिरिक्त आपण काही गुंतवणूक/खर्च केले असल्यास त्याची विहित नमुन्यात सूचना मालकास द्यावी लागते. आपल्या अस्थापनेकडून अशा सूचना देण्यासाठी वरील तीनपैकी कोणतीही अथवा एक वेगळीच अंतिम तारीख असू शकते. ती माहिती करून घेऊन आपली पगाराव्यतिरिक्त वैयक्तिक गुंतवणूक/खर्च केले असल्यास पुराव्यासह सदर तारखेच्या आत केल्यास, सादर केल्यास त्याचा विचार करून अंतिम आयकर आकारणी होईल. हा फॉर्म आणि त्याचे पुरावे देण्यापूर्वी जर आपला कर अतिरिक्त कापला असल्यास समायोजित केला जाईल. १ फेब्रुवारी २०२५ हा सन २०२४-२०२५ चा अर्थसंकल्प सादर करण्याचा दिवस. या वर्षी नव्याने स्थापना झालेल्या सरकारने आपला नव्या कर धोरणाचा आराखडा सरकारने जाहीर केला असून त्यात प्रस्तावित केलेले बदल नवीन आर्थिक वर्षांपासून अमलात येतील, असे सांगण्यात येत आहे. त्यातील काही बदलांना मोठा विरोध होऊ शकेल. कदाचित काही सवलती अजून एक दोन वर्षे चालू राहतील हे समजून घेऊन कोणते अंतिम बदल होतात ते पाहून आपल्या गुंतवणूक धोरणात नव्या आर्थिक वर्षात बदल करावा लागेल. १५ मार्च २०२५ ते ३१ मार्च २०२५ ज्या लोकांना चालू आर्थिक वर्षात अग्रीम कर भरावा लागतो, त्यांनी १५ मार्चपर्यंत १००% आणि त्यानंतरच्या व्यवहारांवरील पूर्ण आयकर ३१ मार्चपर्यंत भरणे अपेक्षित असून याप्रमाणे अग्रीम कर न भरल्यास १% प्रतिमाह दंड होऊ शकतो. त्यामुळे अग्रीम कर भरणाऱ्या करदात्यांनी या तारखा लक्षात ठेवाव्यात. ३१ मार्च २०२५ चालू आर्थिक वर्षात (सन २०२३- २०२५) आयकर सूट मिळावी म्हणून गुंतवणूक/खर्च करण्याचा हा शेवटचा दिवस. (८० सी, ८०डी, ८०टीटीए यानुसार मिळणाऱ्या सवलती) या दिवशी गुंतवणूक किंवा खर्च करून तो आयकर विवरणपत्रात दाखवून कर सवलत मिळवता येईल. जुन्या पद्धतीने कर आकारणी मान्य असलेल्या लोकांना याचा अधिक फायदा होऊ शकतो. अनिवासी भारतीयांना विविध देशांशी असलेल्या करारानुसार ते राहात असलेल्या देशात कर बसत असल्यास त्या देशांशी असलेल्या दुहेरी कर आकारणी धोरणानुसार तेवढ्या कराची सूट भारतात मिळते. अशी सूट मिळवण्यासाठी १० एफ फॉर्म आयकर विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन भरावा लागतो, यासाठी पॅन आवश्यक आहे, त्याशिवाय ऑनलाइन फॉर्म प्रोसेस होऊ शकत नाही. ज्या अनिवासी भारतीयांकडे पॅन नाही अशा व्यक्ती करात सूट मिळवण्यासाठी फॉर्म ऑफलाईन पद्धतीने या तारखेपूर्वी भरू शकतात. १ एप्रिल २०२५ नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात (सन २०२५- २०२६) नवीन वर्षात आपले उत्पन्न किती होईल, नवीन थेट करप्रणाली लागू लागू झाल्यास किती कर लागेल तो वाचवण्यासाठी काय काय तरतुदी आहेत याबाबत प्राथमिक विचार करू शकता. त्याप्रमाणे आपण मागील आर्थिक वर्षाचे म्हणजेच सन २०२४-२०२५ चे आयकर विवरणपत्र भरू शकता त्यासाठी आवश्यक माहितीची जमावजमाव करायला सुरुवात करा, म्हणजे शेवटच्या क्षणी होणारी दमछाक थांबेल. जिथे जिथे आपली मुळातून कर कपात होऊ नये असे वाटत असल्यास आवश्यक तेथे १५ / फॉर्म भरून द्यावेत म्हणजे कर कापला जाणार नाही. १५ जून २०२४ सन २०२५- २०२६ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्नाचा अंदाज करून ३०% अग्रीम कराचा पहिला हप्ता भरण्याची अंतिम तारीख. मालकाकडून कर्मचाऱ्यांना त्यांचे मागील आर्थिक वर्षातील उत्पन्न आणि करकपात यांची सविस्तर माहिती देणारे फॉर्म १६ प्रकारातील प्रमाणपत्र देण्याची अंतिम तारीख. या मुदतीत प्रमाणपत्र मिळाल्यास योग्य मुदतीत विवरणपत्र आपणास भरता येईल. ३१ जुलै २०२५ ज्या करदात्यांना आर्थिक व्यवहारांचे लेखापरीक्षण करावे लागत नाही त्यांना मागील आर्थिक वर्षाचे म्हणजेच सन २०२४-२०२५ चे आयकर विवरणपत्र दंडाशिवाय दाखल करण्याची अंतिम तारीख. ही तारीख मागील तीन वर्षांत बदलली नसल्याने योग्य मुदतीत विवरणपत्र दाखल करावे. १५ सप्टेंबर २०२५ सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी अग्रीम कर भरण्याचा दुसरा हप्ता भरण्याची शेवटची तारीख. यात अंदाजित कराच्या पहिल्या हप्त्यासह ४५% एकूण आयकर भरला जावा, अशी अपेक्षा आहे. ३० सप्टेंबर २०२५ ज्या करदात्यांना आपल्या व्यवहारांचे लेखापरीक्षण करून घ्यावे लागते त्याच्यासाठी आयकर विवरणपत्र दंडाशिवाय दाखल करण्याची शेवटची तारीख. ही तारीख अनेकांचे लेखापरीक्षण पूर्ण होत नसल्याने वाढवली जाते पण भविष्यात ती वाढवली जाईलच याची खात्री देता येत नाही. तेव्हा अशा सर्वच करदात्यांनी याच मुदतीत विवरणपत्र दाखल करावे. ३० नोव्हेंबर २०२५ पेन्शन अँथोरिटीस हयात असल्याचा दाखला देण्याची अंतिम तारीख. आता हा दाखला आपल्या जन्म ज्या महिन्यात झाला त्या महिन्याच्या शेवटच्या दिवशी दिला तरी चालतो. विहित मुदतीत हयातीचा दाखला न दिल्यास निवृत्तिवेतन स्थगित केले जाते. मोबाईल अँपवरून आता हयात असल्याचा दाखला देणे सुलभ झाले आहे.

# शिवरायांच्या प्रेरणास्त्रोत माँसाहेब जिजाऊ

प्रेरणा आणि प्रोत्साहन हे प्रतिभेचे खाद्य असते. स्वराज्य निर्माण कार्यात शिवरायांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्याचे काम राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ यांनी केले आणि जगाला एक वंदनीय व प्रतिभासंपन्न राजा दिला. राजकारण, सम ाजकारण, धर्मकारण, शस्त्र, शास्त्र, शौर्य, पराक्रम, धाडस, मुत्सद्देगिरी, प्रयत्नवाद, विवेक, चिकित्सा, बुद्धिनिष्ठा, अन्याय अत्याचाराविषयी चीड, भेदाभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांडाला प्रखर विरोध, गोरगरीब रयत, शेतकरी, कष्टकरी, म ायमाऊल्यांप्रती प्रचंड आदर, प्रेम, तळमळ, लोककल्याण या सगळ्यांपाठीमागची शिवरायांची प्रेरणा माँसाहेब जिजाऊ होत्या. जगात सुवर्ण अक्षरांनी नोंद झालेल्या मराठ्यांच्या इतिहासाचा मुख्य प्रेरणास्त्रोत म्हणून जिजाऊंची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

इतिहासाच्या कालपटलावर ज्या स्त्री व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला त्यात अग्रभागी असणारे नाव म्हणजे राजमाता राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची नोंद आजही जगभरात घेतली जाते. अशा या थोर युगप्रवर्तक, क्रांतिकारक व धाडसी बहुजननायिकेचा जन्म आजच्या विदर्भातील, बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजाचे लखुजीराजे जाधव व म्हाळसाराणी यांच्या पोटी गुरुवार दिनांक १२ जानेवारी १५९८ रोजी झाला. सिंदखेडराजा येथील जाधव घराण्यातील लखुजीराजे विठोजी जाधव यांना चार मुले होती. अनुक्रमे रघुजी, दत्ताजी, अचलोजी, बहादुरजी या चौघांच्या पाठी जन्मलेले पाचवे कन्यारत्न म्हणजेच माँसाहेब जिजाऊ.

जिजाऊ बुद्धिमान असल्याने त्यांच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था ठेवली होती त्यांना वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी मराठी भाषेबरोबरच आरबी, कन्नड, उर्दू, संस्कृत, फारशी इत्यादी भाषा अवगत होत्या. या सोबतच तलवारबाजी, भालाफेक, घोडदौड, न्यायदान व युद्ध शास्त्रातही जिजाऊ पारंगत होत्या. म ाँसाहेब जिजाऊ समर्थपणे राजसकट पेलवणा-या एक असामान्य कर्तबगार प्रशासक होत्या, राजकारणाच्या उत्तम जाणकार होत्या, प्रतिकूल परिस्थितीवर मात करणा-या कुशल, मुत्सद्दी आणि प्रशासनातही तितक्याच कर्तव्यकठोर होत्या. शिवरायांची माता-पिता, गुरु, मार्गदर्शक अशा विविध भूमिका त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. कुळवाडीभूषण, बहुजनप्रतिपालक, क्षत्रियकुलावतंस, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज आणि साहित्यसम्राट, बुधभूषणकार, रणवीर, शाक्तवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांना घडविणा-या, स्वराज्य निर्माण कार्यात प्रेरणा आणि




प्रोत्साहन देणा-या जिजाऊ स्वराज्य प्रेरिका होत्या. ज्या काळात मराठी मातीत सर्वत्र मुर्दाड आणि निसत्व वातावरण निम ाण झालं होतं, पारतंत्र्य आणि गुलामीबद्दल कोणाला तिटकारा वाटत नव्हता, स्वातंत्र्य गमावल्याबद्दल खेद नव्हता, भूमिपुत्रांना म ुस्कटदाबी मुकाट्याने सहन करावी लागत होती. आसमानी आणि सुलतानीला तोंड देता देता रयत पीचली होती, दैववादी बनून आजचं मरण उद्यावर ढकलत होती. अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड यांनी अक्षरशः हैदोस घातला होता. स्त्रियांना गुलामीचे जीने बहाल केले गेले होते. माणसा माणसात जातीपातीच्या भिंती उभ्या केल्या गेल्या होत्या. समाजाने क्षत्रियत्वाच्या विचारांकडे पाठ फिरवली होती. समाज बलहीन, सत्वहीन आणि तेजोहीन बनला होता. अशा परिस्थितीत जिजाऊंनी प्रयत्नवादी विचारांची पेरणी केली. रयतेच्या गमावलेल्या स्वत्वाला फ ुंकर घातली, त्यांच्यातील स्वाभिमान जागा केला. आणि त्यांना क्षात्र बाण्याची शिकवण दिली, शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभा केलं. या मातीमध्ये शेतक-यांचं, कष्टक-यांचं, मायमाऊल्यांचं राज्य यावं, इथली रयत सुखी व्हावी, अन्याय अत्याचार करणा-या जुलमी सत्ता उद्ध्वस्त व्हाव्यात. स्वराज्य यावं, सुराज्य यावं म्हणून या मातीसाठी आणि म ातीच्या स्वाभिमान आणि अभिमानासाठी अठरापगड जाती धर्माच्या लोकांना मावळा या एका शब्दाने एकत्र बांधून शिवरायांच्या पाठीशी भक्कमपणे उभा केलं आणि स्वराज्य निर्माण केलं.

अन्याय अत्याचार करणा-या जुलमी राजवटी उद्ध्वस्त करून राजकीय दहशतवाद नष्ट करणा-या जिजाऊंनी धार्मिक दहशतवादही फेटाळून लावला. आदिलशहाचा सरदार मुरार जगदेवराव याने इसवी सन १६३० मध्ये पुण्याच्या भूमीवरून गाढवाचा नांगर फिरवला होता व पहार रोवली होती. जो कोणी ही भूमी कसेल अथवा येथे वस्ती करेल त्याचा निर्वंश होईल अशी अफवा पसरवून लोकांच्या मनात प्रचंड दहशत निर्माण केली होती. या दहशतीमुळे पुणे सात-आठ वर्ष ओसाड पडले होते. जिजाऊंनी पुण्यभूम ीच्या काळजात रोवलेली ती अन्याय - अत्याचाराचे, अंधश्रद्धा व कर्मकांडाचे प्रतीक असलेली पहार उपटून फेकून दिली. त्या पुण्यभूमीची नांगरणी करण्यासाठी सर्व जाती धर्माच्या मुलांना शिवबाच्या सोबत घेऊन जातीपातीला स्वराज्यात थारा नाही हे दाखवून दिले. सोन्याचा फाळ लावलेल्या नांगराने ती भूमी नांगरली आणि त्या भूमीचं सोनं केलं. ती पुण्यभूमी झाली. शिवाय सोन्याचा फाळ लावलेल्या नांगराची पूजा करण्यासाठी विधवा आई म्हाळसाराणी व विधवा वहिणी या दोघींना सहभागी करून घेतले आणि मंगलप्रसंगी विधवांना सन्मान दिला.

लाल महाल बांधून स्वतः जिजाम ाता यांनी शिवबांसोबत पुण्यभूमीत राहण्यास सुरुवात केली. त्यामुळे इतर लोकही हळूहळू त्या परिसरात राहण्यास येऊ लागले.यावरून आपल्या लक्षात येते की जिजामाता अफवा, अंधश्रद्धा यांना अजिबात थारा देत नव्हत्या. तोरणा किल्ल्यात खजिना सापडल्यानंतर त्यात सोन्याचे देव होते, त्यांची मंदिरे न बांधता शिवबांनी ते सोन्याचे देव वितळवून स्वराज्य उभारणीसाठी त्या संपत्तीचा उपयोग केला. कोणतेही कार्य करताना मुहूर्त पाहण्याची शिवरायांना कधीच गरज वाटत नसे, उलट ते काम करण्यासाठी अम ावस्येची निवड करीत कारण काळ्या कुट्ट अंधाराचा फायदा घेऊन गनिमी काव्याने याच दिवशी शिवराय मोहिमा फत्ते करीत असत. या सर्व बाबींना जिजाऊंचे भक्कम पाठबळ असे.

निजामशहाणे लखुजीराजे व त्यांच्या मुलांची हत्या केली तेव्हा आई म्हाळसाराणी व वहिनी सती गेल्या नाहीत व पुढे शहाजीराजे भोसले यांच्या निधनानंतर जिजाऊ विधवा झाल्या पण सती गेल्या नाहीत. जिजाऊंनी कर्तव्य श्रेष्ठ समजून स्वतःला स्वराज्य निर्माण कार्यात गुंतवून घेतले. सती न जाण्याचा आणि कर्तव्यपूर्तीचा वसा त्यांनी त्यांच्या मातेपासून व सासू पासून घेतला होता. जिजाऊ बुद्धिनिष्ठ होत्या. अंधश्रद्धाळू तर मुळीच नव्हत्या. सती प्रथे विरोधात बंड करणा-या उमाऊ सासूबाई, म्हाळसाबाई आई व स्वतः जिजाऊ आद्य प्रवर्तक मानल्या पाहिजेत. सती प्रथेला विरोध करून सतीच्या नावावर महिलांना जिवंत जाळण्याच्या अमानवी कर्मकांडाला त्यांनी प्रखर विरोध केला. शिवाजी राजांच्या राणी सोयराबाई रायगडावर प्रसूत झाल्या, राजाराम राजेंचा जन्म झाला. पण ते पालथे जन्माला आले. तरीदेखील कोणतेही कर्मकांड करण्याचा आग्रह जिजामातेने धरला नाही. शकून - अपशकून, शुभ - अशुभ अशा खुळचट कल्पनांना जिजाऊंकडे स्थान नव्हते. समाज सुधारणेचा तो एक आदर्श नमुनाच होता. तो काळ विचारात घेतला तर जिजामाता ह्या प्रखर परिवर्तनवादी आणि रंजल्या गांजलेल्यांच्या पालन करती राजमाता होत्या. यावरून राजकारणाबरोबरच सम ाज आणि धर्म सुधारण्यासाठी जिजाऊंनी त्या काळात उचललेली पावले युगप्रवर्तक होती हे लक्षात येते. जिजाऊ धाडसी होत्या, जिजाऊ विचारी होत्या, विवेकी होत्या, दृष्ट्या होत्या, निश्चयी होत्या, शूर होत्या, पराक्रमी होत्या, लढवय्या होत्या, मुत्सद्दी सेनानी होत्या, जिजाऊंचे संपूर्ण जीवन राष्ट्रनायिकेचे जीवन आहे. मराठ्यांचा इतिहास हा जगाच्या इतिहासातील एक सुवर्णअध्याय आहे आणि जिजामाता ही हा इतिहास घडवणारी एक महान शक्ती होय. त्यांच्या या असामान्य कर्तृत्वामुळेच त्या अविस्मरणीय आहेत. आणि पुढेही चंद्रसूर्य असेपर्यंत अविस्मरणीय राहतील. अशा या थोर मातेचा मृत्यू दुर्गराज रायगडाच्या पायथ्याशी पाचाड या गावी १७ जून १६७४ रोजी झाला. जिजाऊंचा जन्म विदर्भातला, सासर मराठवाड्यातले, कारकिर्दीची सुरुवात पश्चिम महाराष्ट्रातून आणि अखेरचा श्वास घेतला कोकणात म्हणजे संपूर्ण महाराष्ट्राला एका सूत्रात बांधणारे ऐतिहासिक व्यक्तिमत्व म्हणजे राजमाता राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ. या थोर राष्ट्रनायिकेला, युगप्रवर्तक स्त्री व्यक्तिमत्त्वाला जयंती निमित्ताने कोटी कोटी प्रणाम. त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.

ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे
जिल्हाध्यक्ष
मराठा सेवा संघ प्रणित संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष बीड







# अजितदादा गटात स्वबळाचे वारेः?, बड्या नेत्याचं विधान काय? महायुतीला धक्का बसणार?

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने राज्यातील सर्व म हापालिका निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत उभी फूट पडली आहे. एकीकडे महाविकास आघाडीत या घटना घडत असतानाच अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीतही स्वबळावर निवडणुका लढण्याचं घटत आहे. आज राष्ट्रवादीची बैठक पार पडली. यावेळी राष्ट्र वादीचे नेते नवाब मलिक यांनी स्वबळाचा नारा दिला. महापालिका स्वबळावर लढली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. त्यामुळे राष्ट्र वादी स्वबळावर लढणार का? महाविकास आघाडीपाठोपाठ महायुतीलाही धक्का बसणार का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादीची माटुंग्यात आज बैठक होती. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने या बैठकीचां आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीला नवाब मलिक, आमदार सना मलिक आणि सिद्धार्थ कांबळे उपस्थित होते. या शिवाय पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नवाब मलिक यांनी स्वबळावर लढण्याची आग्रही मागणी धरली. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर या मुंबईत आपण कधीच १४ पेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणू शकलो नाही. एकसंघ असतानाही आपण कधीच



जास्त नगरसेवक निवडून आणले नाहीत. आता पक्षाचे दोन भाग झाल्यावर कार्यकर्त्यांच्या मनात चिंता आहे. कार्यकर्ते संभ्रमित आहेत. महापालिका निवडणुकीत स्वबळावर लढायचं की महायुतीत लढायचं हा संभ्रम आहे, असं नवाब मलिक म्हणाले.मित्र पक्ष सोबत घेईल हे विसराजोपर्यंत एखाद्या पक्षाची ताकद नसते तोपर्यंत त्या पक्षाला कोणीही विचारत नाही. आज मित्र पक्ष तुम्हाला सोबत घेईल हे विसरून जा. तुमची ताकद असेल तरच मित्र पक्षही तुम्हाला विचारेल. त्यामुळे तुम्हाला मुंबई म हापालिकेची निवडणूक स्वबळावर लढावीच लागेल. तुम्हाला तुमची ताकद निर्माण करावीच लागेल, असं नवाब मलिक म्हणाले. तर वेगळा ठसा निर्माण करू शकतो नवीन लोकं जोडल्याशिवाय पक्ष वाढत नाही. तुम्हाला वाटत असेल भाजपसोबत जायचं आहे, भाजपसोबत जायचं आहे. पण भाजप परमनंट आपल्यासोबत राहील असं वाटत असेल तर हा विचार सोडून द्या. राजकारणात कोणीही कुणासोबत परमनंट राहत नाही. जो ताकदवान असतो त्याला लोकं विचारतात. ताकद नसेल तर तुम्हाला कुणी विचारणार नाही. उद्या चालते व्हा म्हणून सांगू शकतील, पण आपली ताकद असेल तर आपण स्वबळावर या मुंबईत वेगळा ठसा निर्माण करू शकतो. १४ पेक्षा जास्त नगरसेवक आले नाही, हा आपल्यावरचा ठपका आहे. आपण व्यवस्थित लढलो आणि बुथवर १०० मतांची ताकद निर्माण केली तर आपण जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणू शकतो. आपल्यावरचा ठपका आपण पुसून टाकू शकतो, असंही त्यांनी सांगितलं.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

रविवार १२ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## जिल्हा परिषदेसमोरील अनधिकृत अतिक्रमण हटवल

बीड । प्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जुनी जिल्हा परिषद पर्यंतची जागा तत्कालीन मा.जिल्हाधिकारी व मा.पोलीस अधिक्षक यांनी शिवसंग्राम चालक मालक संघटने अंतर्गत व्यवसायिकांसाठी गाड्या पार्किंगसाठी पर्यायी जागा दिलेली होती.सदरील जागेवर गेल्या अनेक दिवसापासून काही व्यक्तिंनी अनधिकृतपणे अतिक्रमण करून सदर जागा हि चुकीच्या पद्धतीने भाडयाने दिल्या होत्या यामुळे गाडया पार्किंगसाठी दिलेल्या जागेवर अतिक्रमण केल्याने गाड्या पार्किंग आणि रहदारीस अडथळा निर्माण होत होता यामुळे शिवसंग्रामने अतिक्रमण तात्काळ हटवावे अशी मागणी केली होती त्याची दखल घेत काल येथील अतिक्रमणे हटवण्यात आलेली आहेत. शिवसंग्राम चालक मालक संघटनेच्या अंतर्गत भाडे तत्वावर असणाऱ्या गाड्या या अतिक्रमणामुळे रोडवर लागत होत्या. त्यामुळे रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण होत होता.याबाबतीत शिवसंग्रामचे चालक-मालक संघटना यांच्या वतीने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे यांना शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पा., सामाजिक न्याय आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, शहर उपाध्यक्ष शेषराव तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष संदीप भांबे,उपाध्यक्ष रज्जाक पठाण, मार्गदर्शक मोहन वाघमारे,जालिंदर पाखरे, नितीन मुंडे विकास गोटे, राजेश चव्हाण,शंकर मोरे,शेख जमील रफिक काझी,बापूसाहेब पवार,संकेत पाळवदे,विनोद वडमारे,विनोद मस्के,सुनील निसर्गंध प्रभाकर उगले,अभिमान डोंगरे,बंडू मोरे सोनू गुंजाळ,प्रकाश गायकवाड,शेख नबी,अमोल सोनवणे,मधुकर राऊत,उल्हास बांगर,बाबासाहेब शिंदे यांनी निवेदन सादर केले होते यामध्ये तात्काळ अतिक्रमण हटवण्याची मागणी करण्यात आली होती अन्यथा शिवसंग्राम तीव्र स्वरूपाचे आंदोलन करणार असाही इशारा यात देण्यात आला होता.याबाबत तात्काळ उचित कार्यवाही अनुसरण्यात येईल असे आश्वासन मुख्याधिकारी यांनी यावेळी दिले होते आज येथील अतिक्रमण हटवण्यात आले असून यामुळे आता गाड्या पार्किंग आणि रहदारीस होणारा अडथळा दूर झाला आहे. याबद्दल शिवसंग्रामच्यावतीने नगरपालिका प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.

## ग्रंथालय समृद्ध पण वाचक कमी झाले: प्राचार्य डॉ.निंबोर

**आष्टी । प्रतिनिधी आज ग्रंथालये समृद्ध होत आहेत मात्र त्यांना भेट देणारा वाचक वर्ग रोडावला आहे अशी खंत ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. निंबोरे ह्यांनी व्यक्त केली. जिल्हा परिषद कन्या शाळा आष्टी येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा आणि स्कूल कनेक्ट २.० ह्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. आबासाहेब खताळ होते तर मंचावर आष्टी येथील मान्यवर पत्रकार उपस्थीत होते. सर्वप्रथम पत्रकार दिनानिमित्त आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात झाली. फक्त कन्या शाळाच नाही तर इतर ठिकाणी देखील विद्यार्थिनी सर्व विद्याशाखांत अग्रेसर आहेत असे सांगून प्राचार्य डॉ. निंबोरे यांनी वाचन संस्कृती जोपासण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करायला शाळा महाविद्यालये तयार आहेत मात्र विद्यार्थी तुलनेने कमी प्रतिसाद देतात असे सांगितले. आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ३५ हजार पुस्तके आहेत मात्र त्यांना पुरेसा वाचक वर्ग मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना श्री. आबासाहेब खताळ यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शाळेचे ध्येय असून वाचन संस्कृती टिकविण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत असे सांगितले. यावेळी डॉ. अभय शिंदे, डॉ. सुनील मुटकुळे प्रा. निवृत्ती नानवटे, श्री. सुरेश पवार, अविशांत कुमकर, सतीश दळवी, अफसर पठाण, शाहनवाज पठाण, मंगेश पवळ, मुजाहिद सय्यद, सचिन निकाळजे सह आष्टी प्रेस क्लब चे सदस्य तसेच कन्या शाळा आष्टी येथील सर्व स्टाफ व विद्यार्थिनी उपस्थीत होत्या.**

## सेंद्रिय शेती काळाची गरज - गोकुळ बागलाने सा ग वी अधिकारी पाटोदा




पाटोदा प्रतिनिधी :-*पिठ्ठी येथे भागधारक कार्यशाळेस मार्गदर्शन करताना श्री बागलाने सरांनी सांगितले की आपले आरोग्य निरोगी राहन्यासाठी सेंद्रीय शेती जैविक शेती काळाची गरज आहे...तसेच डॉ प्रभाकर कवठेकर नानांनी सांगितले की ग्रामपंचायत जलसंधारण कामास प्राधान्य देनार, सर्व महिलांनी पुरूषांनी फळबागेस प्राधान्य द्यावे, ग्रामपंचायत शासकीय सर्व सहकार्य करेल तसेच वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट करत आसलेल्या कामाबद्दल अभिनंदन करून धन्यवाद मानले... उमेद अभियान प्रभागसमन्वयक सौ देवकते मॅडम यांनी महिलांना उमेदच्या माध्यमातून मिळत आसलेल्या कर्जातुन व्यवसाय निवडावे उदाहरण औजार बँक, दाळमिल, दुग्धव्यवसाय प्रोसेस युनिट टाकावे आसे आव्हान करन्यात आले. वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट शाश्वत उपजिविका प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली....यावेळी सर्व मान्यवर तसेच वॉटरशेड टिम मेंबर श्री अनिल पालवे सर,श्री भरत कवठेकर सर उपस्थित होते....

# नैराश्य, चिंता आणि तणाव महिलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करतात -डॉ. पूनम तागड

पाटोदा । प्रतिनिधी पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या शासकीय ग्रामीण रुग्णालय पाटोदा आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला (अंतर्गत) तक्रार निवारण कक्षाच्या वतीने दि. ०७ जानेवारी २०२५ रोजी महिलांच्या लैंगिक समस्या आणि मानसिक आरोग्य या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. इम्रान शेख, वैद्यकीय अधिकारी डॉ. पूनम तागड मॅडम, सिस्टर काळे मॅडम, श्री. दिशांत भारती व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम



मान्यवरांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यशाळेच्या समन्वयक प्रा. ज्योती रकटे यांनी केले. महिलांच्या चांगल्या आरोग्यासाठी शासनाच्या वतीने अशा शिबिराचे आयोजन करण्यात येते. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात महिलांची वैद्यकीय तपासणी व मानसिक आरोग्य या विषयावर प्रमुख पाहुणे डॉ. इमरान शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. युवकांनी १८ ते ३० वयोगटात वेगवेगळ्या चांगल्या सवयी लावून आपले मानसिक आरोग्य सुधारावे, वाईट सवयी दूर कराव्यात, इंटरनेटचा वापर कमी करावा, मोबाईलचा वापर कमी करावा, वाचन खेळ, वेगवेगळ्या स्पर्धेत सहभाग घ्यावा आणि मानसिक तणावापासून दूर राहण्याचे आव्हान डॉ. शेख यांनी केले. जीवनातील घटना आणि हार्मोनल बदल स्त्रियांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करू शकतात. सामाजिक अपेक्षा आणि स्त्रियांवरील दबाव, तसेच महिलांना माता, पत्नी आणि व्यावसायिक म्हणून त्यांच्या भूमिकांशी संबंधित अतिरिक्त दबावांचा सामना करावा लागतो. एकाधिक जबाबदाऱ्यांमध्ये संतुलन राखणे जबरदस्त असू शकते आणि यामुळे तणाव, चिंता आणि नैराश्य देखील वाढू शकते.हार्मोनल बदल जे स्त्रियांना आयुष्यभर अनुभवतात. तारुण्य, गर्भधारणा, प्रसूतीनंतरचा कालावधी आणि रजोनिवृत्ती या सर्वांमध्ये लक्षणीय हार्मोनल चढउतार असतात ज्यामुळे मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. लिंग-आधारित हिंसा आणि आघात दुर्दैवाने, स्त्रिया देखील लिंगआधारित हिंसा आणि आघात अनुभवण्याची अधिक शक्यता असते, ज्याचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर दीर्घकाळ परिणाम होऊ शकतो. लैंगिक अत्याचार किंवा घरगुती हिंसाचारातून वाचलेल्यांना पी. टी. एस. डी., नैराश्य आणि इतर मानसिक आरोग्य विकारांचा सामना करावा लागतो असे सांगितल

## मिल्लिया महाविद्यालयात राजश्री शाहू महाराज व्याख्यानमालेचे आयोजन

बीड। प्रतिनिधी येथील मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयाच्या सामाजीकशास्त्र विभाग व विद्यार्थी कल्याण विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने राजश्री शाहू महाराज व्याख्यानमालेचे आयोजन आज पासून ते १६ जानेवारी २०२५ पर्यंत करण्यात आले आहे. या व्याख्यान मालेतील पहिले व्याख्यान आज रोजी आयोजित करण्यात आले होते.या व्याख्यान मालेचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सय्यद हनीफ यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ.के.के.कलाने, पदवीत्तर संचालक प्रोफेसर फरीद अहमद नेहरी, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. खय्युम फारुखी, डॉ. शेख गफूर अहमद, डॉ. शेख हुसेन, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.सय्यद तनवीर यांची उपस्थिती होती.प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून डॉ. कलाने के. के. इतिहास विभाग विभाग प्रतिभाताई पाटील महाविद्यालय नेकनूर यांनी राजश्री शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याबद्दल माहिती देऊन शाहू महाराज यांनी आपले संपूर्ण जीवन हे समाजाच्या कल्याणासाठी व्यतीत केले. वेदोत्तर व वेदोपुर्व मंत्राचा वापर, सामाजासाठी शिक्षण, वस्तीगृह,नोकरीत ५०% आरक्षण इत्यादी त्याच्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन डॉ. शेख हुसेन यांनी केले तर आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभागाप्रमुख डॉ. खय्युम फारुखी यांनी केले. व्याख्यानमालेत एकूण पाच व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत, असे व्याख्यानमालेच्या संयोजिका तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सय्यद तनवीर यांनी सांगितले. कार्यक्रमास विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक वृंद, कर्मचारी वृंद यांची उपस्थिती होती. व्याख्यान मालिकेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.०००

## पाटबंधारे, जलसंधारण, कृषी विभागाची आढावा बैठक

आष्टी । प्रतिनिधी आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील विविध कामांबाबत पाटबंधारे विभाग, कृषी विभाग, जलसंधारण विभागाची आढावा बैठक येथील पंचायत समिती सभागृहात शुक्रवारी दुपारी पार पडली. आमदार सुरेश धस, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच जिल्हास्तरीय विभागीय आणि उपविभागीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली. आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील कृषी व पाटबंधारे विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत , प्रलंबित खुंटेफळ साठवण तलाव योजने संदर्भात जलद गतीने पावले उचलून कामास गती देणे. वन विभागाच्या क्षेत्रावर असलेल्या ग्लिरिसिडीया या वनस्पतीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे विदारक चित्र समोर येत असून त्या ऐवजी वड, पिंपळ आदी वृक्षांची लागवड मनरेगाच्या माध्यमातून प्राधान्यक्रमाने करणे. सिंदफणा प्रकल्पाची उंची वाढविणे सुरत चेन्नई या महामार्गासाठी आष्टी मतदार संघातून जात असलेल्या राष्ट्रीय मार्ग-४६ रस्त्याबाबत जमीन अधिग्रहण करणे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी एसटी महामंडळाच्या फेऱ्या वाढवणे तसेच मच्छिंद्रनाथ गडावर मुक्कामी बस सुरू करणे. पिंपळा लोणी मार्गे अहमदनगर ही बस सुविधा यासह महिंदा, मोराळा, पाटसरा यासह ग्रामीण भागातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी बस सेवा उपलब्ध करून देणे बाबत चर्चा झाली. १३ जानेवारी २०२५ पासून आष्टी मतदारसंघात व्ही रमणी आणि जरेवाडी पॅटर्न सुरू होणार असून यामुळे शाळाबाह्य होत असलेल्या ऊसतोड मजुरांची मुले मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि शिक्षण सुविधा सहज आणि सोप्या पद्धतीने उपलब्ध होण्यासाठी हा पॅटर्न अत्यंत महत्त्वाचा असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक विभागाने गांभीर्यपूर्वक घेण्याविषयी सूचना देण्यात आल्या. यासह मतदार संघातील विविध विषयांवर तसेच विकास कामांवर सविस्तर चर्चा झाली. या आढावा बैठकीसाठी जिल्हाधिकारी श्री अविनाश पाठक साहेब यांच्यासह सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## भिडे वाडा कार कवी विजय वडवेराव आयोजित पहिली मुलींची शाळा आंतरराष्ट्रीय काव्य जागर

भिडे वाडा कार कवी विजय वडवेराव आयोजित देशातील पहिली मुलींची शाळा आंतरराष्ट्रीय काव्य जागर अभियानांतर्गत पहिले आंतरराष्ट्रीय फुले फेस्टीवल २०२५यात विमलाबाई लुंकड विद्यालयातील शिक्षिका फुलेप्रेमी कवयित्री कांचन मून (भरणे) हडपसर पुणे व फुलेप्रेमी कवयित्री वर्षा सतिश शिंदे गुलटेकडी पुणे या दोन शिक्षिका यांना भिडेवाडाकार कवी फुलेप्रेमी विजय वडवेराव यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय फुलेप्रेमी समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच विमलाबई लुंकड विद्यालयातील शिक्षिका संगिता भाऊ चौधरी व सुनिता किसन पवार यांनी आपल्या स्त्री शिक्षण देशातील पहिली मुलींची शाळा भिडे वाडा व सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित कविता सादर केली.यांचा सन्मान संविधान,पेन व सन्मानचिन्ह देऊन फुलेप्रेमी कवी विजय वडवेराव सर यांनी केले.सर्व शिक्षक मुख्याध्यापक यांनी अभिनंदन केले.विमलबाई लुंकड विद्यालयातील मुख्याध्यापक संदिप मनोहर सातपुते यांनी व शाळेतील सर्व सहशिक्षकांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. दिनांक २/०१/२०२५ ते ५/०१/२०२५ या कालावधीत एस एम जोशी सभागृह गांजवे चौक या ठिकाणी जगातील पहिले आंतरराष्ट्रीय फुले फेस्टीवल २०२५ भिडेवाडाकार कवी फुलेप्रेमी विजय वडवेराव आयोजित देशातील पहिली मुलींची शाळा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियानांतर्गत या फेस्टीवल चे आयोजन करण्यात आले होते.यात फुले प्रेमी शिक्षिका वर्षा शिंदे मॅडम यांनी स्वतः रचलेला भिडेवाडा देशातील पहिली मुलींची शाळा या विषयावर आधारित पोवाडा व मी सावित्री बोलते हे एकपात्री नाटक सादर करण्यात आले. सादरीकरणात इयत्ता पाचवी, सहावी व सातवी चे विद्यार्थ्यांचा सहभाग होता व फुले प्रेमी शिक्षिका कांचन मून (भरणे) यांनी सहकार्य केले.तसेच या फेस्टीवल मध्ये शिक्षिका कांचन मून यांनी ज्ञानाई सावित्रीमाई व भारतीय मुस्लिम पहिली शिक्षिका माई फातिमा शेख यांची वेशभूषा केली होती. या फेस्टीवल मध्ये जगभरातून एकुण २५ फुलेप्रेमी कवी कवयित्री यांना आंतरराष्ट्रीय फुलेप्रेमी समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## पी.एम.किसान आणि निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान आठवडाभरात मिळणार-आ.विजयसिंह पंडित


बीड । प्रतिनिधी संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने पात्र केलेल्या १२ हजार लाभार्थ्यांना मंजुरी आदेश देवून नियमित अनुदान सुरु करावे, कृषी आणि महसुल विभागाच्या अधिकार्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे प्रलंबित राहिलेल्या पी.एम.किसान योजनेतील ३ हजार पात्र लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान सुरु करण्यासह ग्रामपंचायत विभक्तीकरण, प्रलंबित मावेजा प्रकरणे यांसह विविध विषयासंदर्भात आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने संबंधित अधिकार्यांना सूचना देवून पात्र लाभार्थ्यांना आठवडाभरात अनुदान मिळेल असे आश्वासन दिले. विविध विषयात येणार्या अडचणीच्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर मार्ग काढण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. बैठकीला जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन




अमरसिंह पंडित यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. गेवराई विधानसभा मतदार संघातील विविध विषयांच्या अनुषंगाने आ.विजयसिंह पंडित यांनी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेतली. संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने गेवराई तालुक्यातील सुमारे १२ हजार पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजुर केले आहेत. मात्र तहसिल कार्यालयातील दफ्तर दिरंगाईमुळे पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशाचे वाटप न केल्यामुळे मागील चार महिण्यांपासुन निराधार लाभार्थी अनुदानापासुन वंचित होते. कृषी आणि महसुल अधिकार्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे शुल्लक त्रुटी काढुन तालुक्यातील तीन हजार लाभार्थी पी.एम. किसान योजनेच्या रास्त लाभापासुन वंचित आहेत. या दोन्ही प्रश्नांबाबत आ. विजयसिंह पंडित यांनी बैठकीत विचारणा केली. त्याच बरोबर या बैठकीत ग्रामपंचायत विभक्तीकरण करुन बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देणे, प्रलंबित भुसंपादनाची प्रकरणे, श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील तिर्थक्षेत्र विकास आराखडा यासह विविध विषयांवर या बैठकीत चर्चा होवुन अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले. प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना (पी.एम. किसान) मधील अपात्र झालेल्या सुमारे तीन हजार लाभार्थी शेतकर्यांना आवश्यक असलेले महसुली पुरावे उपलब्ध करुन देण्याच्या सुचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी तहसिलदारांना दिल्या

# जर या पुढे मराठ्यांना त्रास झाला तर सामना:.ही धमकी नाही तर, मनोज जरांगे यांचा धनंजय मुंडेवर सभेतून हल्ला

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी धारशिवमधील आक्रोश मोर्चातून धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्ला केला. गाठ मनोज जरांगे यांच्याशी आहे. २५ जानेवारीनंतर तुमची मस्ती उतरवणार, असे मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडे यांना थेट म्हटले आहे. मनोज जरांगे जाहीर भाषणात म्हणाले, जर या पुढे मराठ्यांना त्रास झाला तर सामना मनोज जरांगे यांच्याशी आहे. धनंजय मुंडे यांना सांगतो, तुमची टोळी थांबवा. ही धमकी नाही तर सावध करत आहे. यापुढे तुमच्या गुंडांनी कोणाला त्रास दिला तर लक्षात ठेवा त्यांचा बंदोबस्त आम्ही करणार आहोत. तुमचे पाप झाकण्यासाठी पांघरुन घेऊ नका, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. २५ तारखेनंतर सोडणार नाही मी मागे लागलो तर पाणी पाजल्याशिवाय सोडत नाही. मी २५ तारखेपर्यंत काहीच बोलणार नाही. त्यावेळी उपोषण केल्यावर मराठा समाजास आरक्षण मिळाल्यावर मग धनंजय मुंडे यांना पाहतो. धनंजय मुंडे हे त्यांचे पाप लपवण्यासाठी ओबीसीचे पांघरुन घेत आहे, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. हा मकोका आम्हाला अमान्यमनोज जरांगे म्हणाले, संतोष देशमुख प्रकरणातील खून प्रकरणातील आरोपींवर मकोका लागला आहे. पण जर खंडणीतील आरोपीला मकोका लागला नाही तर आम्हाला हा मकोका मान्य नाही. खंडणीतील आरोपीवर मकोका लागला पाहिजे. खंडणीमुळेच हा गुन्हा घडला आहे. त्यामुळे खंडणीतील आरोपी हे खुनाच्या गुन्ह्यात आले पाहिजे. मुख्यमंत्री साहेब तुम्ही कुटुंबाला शब्द दिला तो पाळा. मराठा समाजास संबोधित करताना मनोज जरांगे म्हणाले, शांत राहा. पण तुमच्या कुटुंबाचे, गल्लीचे गावाचे संरक्षण



करावे तुम्हाला करावे लागणार आहे. तुमचा समाज तुम्हाला जिवंत ठेवावा लागणार आहे. गाफील राहू नका. एकमेकांना मदत करा नाहीतर मुडदे पडतील, आपल्या लेकी बाळे संपतील. किती दिवस आपण मुक्र्याप्रमाणे बसणार आहात. हे मुठभर आहेत, त्यांचा माज उतरवण्यास वेळ लागणार नाही. संतोष देशमुख यांना न्याय मिळत नाही, तर यापुढे सावध राहा. मी त्यांना मोजत नाही. कधी मोजणार नाही. मी मृत्यूस घाबरत नाही. तुम्हाला मरा म्हणून सांगणार नाही. परंतु तुम्ही बेफीकर राहू नका. या लोकांना नीट करण्याचा सर्व गोष्टी मराठ्यांचा हातात आहे. ही लोक धनंजय देशमुख यांना धमकी देत आहेत आणि आम्ही गुंडांना बोलायचे नाही का? आता जशाच्या तसे उत्तर द्यावे लागणार आहे, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

धनंजय मुंडे तुमच्या घरातील कोणी मेल्यावर आम्ही मोर्चा काढायचे काय? आमच्या संतोष देशमुख यांच्या जीव घेतला, त्यानंतर तुमचे समाधान झाले नाही. प्रतीमोर्चा काढण्याचे सांगत आहात. हे लक्ष मस्तीत वागू लागत आहे. त्यांच्या मुजोरपणामुळे त्यांची पत कमी करुन घेतली आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १२ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## संघर्षातूनच दिव्यत्व प्राप्त होते-ना.पंकजाताई मुंडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत तीनही दिवस दररोज सायंकाळी ६.३० वाजता युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी प्रसिद्ध व्याख्याते प्रा.अभय भंडारी यांनी मस्वामी विवेकानंद आणि भारतीय राष्ट्रवादफ या विषयावर आपले मौलिक चिंतन मांडले. व्याख्यानमालेचे उद्घाटन बँकेच्या संचालिका तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात भारतमाता, स्वामी विवेकानंद, पंडित दीनदयाळजी उपाध्याय यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्ज्वलनाने करण्यात आली. बँकेच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तर यावेळी बँकेचे संस्थापक प्राचार्य राजाभाऊ धाट यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख व्याख्याते प्रा.अभय भंडारी, भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा, बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, तर प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे सचिव धनराज सोळंकी, छत्रपती राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेचे अध्यक्ष राजू मोरे आणि दीनदयाळ बँकेचे संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, सर्व संचालक श्री इंजि.बिपीन क्षीरसागर, मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, प्रा.अशोक लोमटे, प्रा.जयकरण सुरेशकांबळे, डॉ.विवेक दंडे, चैनसुख जाजू, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी, महादेव ईटके व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, संघर्षातूनच दिव्यत्व प्राप्त होत

# ७ जणांना मोक्का लागलाय, राहिलेल्या बोक्यालाही सुरेश धस यांचा वाल्मिक कराडविरुद्ध निशाणा



बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली. त्यांच्या हत्येला एक महिना उलटला आहे. मात्र अद्याप याप्रकरणातील सर्व आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. या प्रकरणाच्या चौकशीसाठी विविध चौकशी समिती नेमण्यात आल्या आहेत. त्यातच आता नुकतंच याप्रकरणी अटकेत असलेल्या आरोपींवर मोक्का लावण्यात आला आहे. सुदर्शन घुले, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे, विष्णू चाटे, सिद्धार्थ सोनावणे आणि जयराम चाटे अशा ७ जणांवर मोक्का कायद्यांतर्गत खटला चालणार आहे. एसआयटीने हा मोक्का लावला असून सध्या या प्रकरणाचा तपास सुरु आहे. आता या प्रकरणावरुन भाजपचे आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे कौतुक केले आहे. त्यासोबतच एक मागणीही केली आहे.संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड असल्याचा आरोप होत आहे. वाल्मिक कराडला सध्या खंडणीच्या गुन्ह्यात अटक झाली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात त्याला अटक झालेली नाही. म्हणून वाल्मिक कराडला मोक्का लावलेला नाही. आता सुरेश धस यांनी वाल्मिक कराडलाही मोक्का लावावा अशी मागणी केली आहे. आज धाराशिवमध्ये ते बोलत होते.मुख्यमंत्र्यांनी आमचं सर्व ऐकलं आता:सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी धाराशिवमध्ये मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात सर्वपक्षीय नेते सहभागी झाले होते. या मोर्चावेळी सुरेश धस यांनी जोरदार भाषण केले. या भाषणावेळी सुरेश धस यांनी वाल्मिक कराडवरही मोक्का लावा, अशी मागणी केली. ॲट्रॉसिटी दाखल करू नका म्हणून ज्या आकाने कॉल केला त्याला आरोपी करा. काही लोक आधी म्हणतात मी असं करेन, तसं करेन. पण जेव्हा बिन भाड्याच्या खोलीत गेले की सगळे गार होतात. मुख्यमंत्री साहेबांनी आमचं सगळं ऐकले आहे. मोक्का लावतो म्हणाले तो ही लावला. आता ७ जणांना मोक्का लागलाय, पण राहिलेल्या बोकाला पण मोक्का लागला पाहिजेङ्क, असे सुरेश धस म्हणाले.

## स्थानीय गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी;फरार आरोपींना अटक पुणे येथील कोयता गँग मधील कुख्यात सातपुतेला शस्त्रासह पकडले

बीड । प्रतिनिधी पुणे येथील कुख्यात कोयता गँगचा फरार मुख्य आरोपी गोरख सातपुते (उर्फ बप्पा) व त्याचा साथीदार तात्याराव उर्फ वैंभव पहाडे यांना बीडच्या स्थानीय गुन्हे शाखेने गेवराई शहरात अटक केली आहे. आरोपींच्या ताब्यातून कोयता, तलवार, चाकू आणि गुन्ह्यात वापरलेली रिक्षा असा एकूण १,०४,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अवैध शस्त्रे व धंद्यांविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार, स्था. गु. शा. पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांनी त्यांच्या अधिनस्त



पथकाला गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई करण्याचे निर्देश दिले. दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी उपनिरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे व त्यांचे पथक गेवराई उपविभागात पेट्रोलिंग करत असताना पोलीस नाईक विकास वाघमारे यांना गुप्त माहिती मिळाली की, म्हाडा कॉलनीजवळ एका रिक्षामध्ये दोन इसम तलवार व कोयता घेऊन थांबले आहेत. ही माहिती वरिष्ठांना देऊन तत्काळ कारवाईचे आदेश घेण्यात आले.पथकाने म्हाडा कॉलनीजवळ सापळा रचून दोन्ही इसमांना पकडले. आरोपींची ओळख पुढीलप्रमाणे आहे:१. गोरख सातपुते (वय २९, रा. काळेवाडी फाटा, थेरगाव, पुणे)२. तात्याराव उर्फ वैंभव पहाडे (वय २८, रा. रहाटी फाटा, अमरदीप कॉलनी, पुणे)तपासादरम्यान समजले की, हे दोन्ही आरोपी पुण्यातील कुख्यात कोयता गँगचे सदस्य असून, काळेवाडी पोलीस ठाण्यातील हाफ मर्डरप्रकरणी (गुन्हा क्रमांक १०/२०२५) फरार होते.दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४, २५ अंतर्गत गुन्हा नोंदवून पुढील तपासासाठी त्यांना गेवराई पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे, पोलीस नाईक विकास वाघमारे,तुळशिराम जगताप,कैलास ठोंबरे, मनोज वाघ, विष्णू सानप, राहुल शिंदे, आणि चालक सुनिल राठोड यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## देवडी येथील राणुबाई देवीची १५ जानेवारीला यात्रा

वडवणी । प्रतिनिधी तालुक्यातील देवडी येथे पौष पोर्णीमेला राणुबाई देवीचा मोठा यात्रा महोत्सव भरत असतो. यावर्षी पौर्णिमा आणि मकरसंक्रांत एकाच दिवशी आल्यामुळे यात्रा बुधवार दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी भरणार असून या यात्रा महोत्सवासाठी येणार्या व्यापार्यांची व भावीकांची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांना जागा उपलब्धकरुन देणे,पाणी लाईट व्यवस्था वाहन पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती गावचे सरपंच सरपंच अतुल झाटे यांनी दिली. वडवणी पासून उत्तरेस १५ किलोमीटर अंतरावर साडेचार हजार लोकसंख्या असलेले देवडी एक सदन गाव आहे.या ठिकाणी पूर्वीपासूनच नवसाला पावणारी रानुबाई देवी म्हणून प्रसिद्ध आहे.या ठिकाणी मोठे देवीचे मंदिर आहे. महाराष्ट्रातील हजारो भावी भक्तांच्या आराध्य दैवत राणूबाई देवी कडे भाविक भक्त नवस बोलतात व ही देवी भाविक भक्तांचे नवसही पूर्ण करते आणि ते देवीचे नवस फेडण्यासाठी गेली नऊ दिवस झाले अंगाला हळद लावून हे भाविक भक्त कोणालाही स्पर्श न करता देवीच्या दरबारामध्ये नऊ दिवस पूजा आराधना करत असतात.या नऊ दिवसांमध्ये संपूर्ण गावातील देवी भक्त उपवास करत असतात.या नऊ दिवसांमध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध आराधी मंडळ,भारुड,गवळणी आधी भरगच्च कार्यक्रमांची गावकर्यांना मनोरंजन पर मेजवानी असते.देवडी गावातील व पंचक्रोशीतील माहेर वासिनी लेकी बाळी आपल्या लाडक्या रानुबाई देवीची खना नारळाची ओटी भरण्यासाठी व आशीर्वाद घेण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून पौष पोर्णीमेला हजेरी लावत असतात.नवस करणारे देवीभक्त आठ दिवस अंगाला हळद लावून पूजाआराधना करून नवव्या दिवशी म्हणजे पौष पौर्णिमेला गुलालाची व लेवड्यांची उधळण करत देवीचा गजर करत या यात्रा उत्सवामध्ये बुधवार दि १५ जानेवारी रोजी दुपारी १२ वा गाड्या ओढण्यात येणार आहेत. तर गुरूवार दिनांक १६ जानेवारी रोजी कुस्त्याचा कार्यक्रम होणार आहे.

## आमदार गुट्टे यांची प्रशासकीय यंत्रणेला दमबाजी !

परभणी / जल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, तहसील, पंचायत समिती, महावितरण किंवा अन्य प्रशासकीय कार्यालयातील अधिकारी तथा कर्मचार्‍यांनी टी एस, प्र मा, वर्क ऑर्डर, बील काढणे इत्यादी कामांसाठी पैसे मागितल्यास माझ्याशी संपर्क करा. जर कोणत्याही अधिकार्‍यांनी किंवा कर्मचार्‍यांनी कोणत्याही सर्वसामान्य नागरिकांकडून पैसे घेतल्याचे आढळून आल्यास, त्या अधिकार्‍यांची गाठ माझ्याशी आहे, हे लक्षात ठेवा, अशाप्रकारे इशारा देणारे, नव्हे नव्हे, चक्क दमबाजी देणारे आवाहन दुसरे तिसरे कोणी नसून गंगाखेड विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी जनतेला उद्देशून केले आहे. आ.गुट्टे यांनी केलेल्या अशा या आवाहनामुळे ही प्रशासकीय यंत्रणेला थेट दमबाजी तर नाही ना, असा विचार कोणी हितचिंतक नक्कीच करु शकतील. परंतु दुसर्‍या बाजूने असाही विचार करता येईल की, ते एक लोकप्रतिनिधी आहेत. आपल्या मतदार क्षेत्रातील नागरिकांना कोणत्याही कामासाठी प्रशासकीय यंत्रणेकडून पिळवणूक होता कामा नये, यासाठी त्या सर्वांना दिलासा देणे, हे क्रमप्राप्तच ठरु शकते. तथापि याही पुढे जाऊन सांगायचे झाल्यास आ.गुट्टे यांनी घेतलेली ही लोकहिताची भूमिका कित्येकांना रुचली जावू शकेल असेही नसते. त्यामुळे त्यांच्या सडक्या मेंदूमध्ये यापेक्षा चांगला हेतू येण्या ऐवजी ते असंही म्हणू शकतात की, यामागे निश्चितच काही तरी गौडबंगाल असू शकते. तात्पर्य हेच की, जेवढ्या व्यक्ती, तेवढ्या प्रवृत्ती, असणे स्वाभाविकच आहे. तद्वतच आ.गुट्टे यांनी केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने जर गांभीर्यपूर्वक विचार केला तर खरंच परभणी जिल्हा व गंगाखेड विधानसभा क्षेत्रातील सर्वच प्रशासकीय विभागात अशा प्रकारची खुलेआम पैशाची मागणी करुन सामान्य नागरिकांना जाणीवपूर्वक वेठीस धरले जात असावे का, जर हे खरे असेल तर प्रशासकीय यंत्रणा खरोखरच सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक करीत आहेत,

## बीएसएनएल मोबाईल ग्राहकांना अखंडीत सेवा द्यावी-शंकर देशमुख



आष्टी । प्रतिनिधी भारत संचार निगमची सततच्या विस्कळीत मोबाईल नेटवर्कमुळे आष्टीसह कडा परिसरातील असंख्य मोबाईल धारक त्रस्त झाले असून, ग्रामीण भागातील मोबाईल ग्राहकांना पुर्ण क्षमतेने सुरुळीत सेवा पुरवावी अशी मागणी भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी संचार निगमचे महाप्रबंधक राजेंद्रसिंह चोंगाड यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे. आष्टीसह कडा शहरातील बाजारपेठ मोठी असून, याठिकाणी परिसरातील वीस ते पंचवीस गावांचा संपर्क आहे. शासकीय कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, राष्ट्रीयकृत, सहकारी बँका, रुग्णालये, शाळा, महाविद्यालय आहेत. शासकीय योजनांची माहिती, नोंदणी, शेतकरी अनुदान, विद्यार्थी, तरुणांना शिष्यवृत्ती अर्ज यासारखी कामे ऑनलाईन करावी लागतात. परंतू मागील काही दिवसांपासून भारत संचार निगमची मोबाईल सेवा आष्टी तालुक्यात पुर्णपणे विस्कळीत झाली असल्यामुळे मोबाईल धारकांना अडचणीचा सामना करावा लागत असल्याने ग्राहक इतर महागड्या मोबाईल कंपन्यांकडे आकर्षित होताना दिसत आहे. त्यामुळे भारत संचार निगमने ग्रामीण भागातील मोबाईल ग्राहकांना पुर्ण क्षमतेने व सुरुळीत सेवा पुरवावी. अशी मागणी भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी संचार निगमचे महाप्रबंधक राजेंद्रसिंह चोंगाड यांच्याकडे निवेदनाव्दारे केली. याप्रसंगी पत्रकार राजेंद्र जैन, दिलिप परदेशी, राजेश शिंदे आदी उपस्थित होते.

## विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये बीड जिल्ह्याचा नाव लौकिक वाढवा-जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी दिनांक ९ जानेवारी रोजी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली जालना येथे होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धा नियोजनासाठी पूर्वतयारी बैठक पार पडली . या बैठकीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , महेंद्रकुमार कांबळे , अरविंद लाटकर , कविता जाधव , फातेमा शेख , ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नरेंद्र कुलकर्णी , अविनाश शिंगटे , तेजस्विनी जाधव , शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे , माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर , शिरुरचे तहसीलदार सुरेश घोळवे व इतर अधिकारी , कर्मचारी उपस्थित होते . दरवर्षी महसूल विभागातर्फे विभागीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात येतात . यावर्षीही फेब्रुवारी महिन्यात जालना येथे या स्पर्धा संपन्न होणार आहेत . या स्पर्धेसाठी पूर्वतयारी म्हणून आज ही बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या स्पर्धेसाठी प्रोत्साहन दिले व जेव्हा आपण स्पर्धांमध्ये भाग घेतो तेव्हा कोणी जिल्हाधिकारी नाही किंवा कोणी कोतवाल नाही , प्रत्येक पदाच्या व्यक्तीला या स्पर्धेमध्ये भाग घ्यावा व जिल्ह्याचा मान वाढवावा असे म्हणून प्रोत्साहन दिले . या बैठकीमध्ये सर्व तालुक्यातील सहभाग घेऊ इच्छिणारे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते . जालना येथे होणाऱ्या सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत . त्यामध्ये क्रिकेट , फुटबॉल , हॉलीबॉल , खो-खो , कबड्डी , थ्रो बॉल अशा वेगवेगळ्या प्रकारच्या खेळांचा समावेश करण्यात आला आहे . तसेच सांस्कृतिक स्पर्धांमध्ये वैयक्तिक नृत्य , समूह नृत्य , गायन , नाटिका एकपात्री नाटिका अशा विविध प्रकारच्या स्पर्धांचा समावेश करण्यात आलेला आहे . त्यासाठीचे सखोल नियोजन करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती . प्रत्येक प्रकारच्या स्पर्धासाठी एक समन्वय अधिकारी नेमून त्या त्या क्रीडा स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त बक्षीसे मिळवण्याचा संकल्प करण्यात आला . बीड हा कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा जिल्हा आहे व तिथे कलाकारांची कुठलीच कमतरता नाही , त्यामुळे या स्पर्धांमध्ये बीड जिल्हा अव्वल क्रमांकावर येईल असा विश्वास उपजिल्हाधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांनी केला . सांस्कृतिक कार्यक्रमांचे नेतृत्वही त्यांनी स्वीकारले . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी संचलनाचे नेतृत्व स्वीकारले . सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट गायन , उत्कृष्ट अभिनय , उत्कृष्ट वैयक्तिक नृत्य , वेशभूषा , नकला , वादक , दिग्दर्शक अशा प्रकारे प्रत्येक उत्कृष्ट कलाकृतीला गुण दिले जाणार आहेत . सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रत्येक जिल्ह्यास ५० मिनिटे वेळ देण्यात येणार आहे . दरवर्षी या महसूल क्रीडा स्पर्धा दैनंदिन शासकीय कामापासून दूर राहणे व उत्साही होऊन पुन्हा जोमाने काम करणेस्तव लाभदायी ठरतात . त्यामुळे रोजच्या दैनंदिन कामकाजापासून दूर होऊन सगळ्यांसाठी ही एक पर्वणीच असेल . आरोग्यासाठीही खेळ हा अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे . वर्षातून एकदा तरी आपण स्वतःसाठी वेळ काढून या स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे आणि पूर्ण जोमाने बक्षीसे मिळवण्यासाठी प्रयत्न करावा , असे या बैठकीमध्ये निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सांगितले . महिलांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सर्व अधिकारी , कर्मचारी यांच्या वतीने आश्वासित केले की आम्ही सर्वजण एकोप्याने स्पर्धांची तयारी करू आणि बीड जिल्हा विभागात प्रथम कसा येईल यासाठी प्रयत्न करु. शेवटी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी सर्वांना शुभेच्छा देऊन बैठकीची सांगता केली. या बैठकीनंतरच लगेच महसूल अधिकारी बैठक घेण्यात आली . या बैठकीस उपविभागीय अधिकारी तहसीलदार उपस्थित होते . यावेळी बोलताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी सूचित केले की मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत जिल्ह्यात जवळपास ३५ ठिकाणी सौर प्रकल्प कार्यान्वित होणार आहेत . त्यासाठी सर्व अधिकारी यांनी प्रकल्प सुरळीतरित्या सुरू होण्यासाठी प्रयत्न करावेत . तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसांचा कार्यक्रम घोषित केला आहे. यात मुख्यता कार्यालय स्वच्छता , प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे अशा बाबींवर प्रत्येक अधिकाऱ्याने स्वतः लक्ष द्यावे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RA-

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com